**वाचले:-१) अर्जदार राधास्वामी सत्संग ब्यास, विशाल छुगेरा प्रॉपर्टीज इंडीया प्रा.लि., श्री. विशाल अशोक छुगेरा रा. केसनंद ता.हवेली जि.पुणे** यांचा महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे यांचे व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केलेला **दिनांक. १५/११/२०१८ व दि.२८/०२/२०१९** रोजीचा अर्ज.

२) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यालयाकडील **पत्र क्र. बीएचए/मौ. केसनंद/ग.नं.९०पै./प्र.क्र.१२७०/१८-१९/५८१ दिनांक-२८/०२/२०१९** रोजीचे पत्र.

३) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील महाराष्ट्र अध्यादेश क्र.२ दिनांक. ०५/०१/२०१७.

४) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. एनएए-२०१७/प्र.क्र.११५/ टी-१ दिनांक-१९ ऑगस्ट २०१७

५) मा. आयुक्त पुणे विभाग पुणे यांनी त्यांचेकडील आदेश क्र. मह/२/वतन/सीआर/११६/२००६ दि.२२/०८/२००८

६) या कार्यालयाकडील पत्र क्र. पमह/कावि/२५०६/२०१८ दि.०७/१२/२०१८

७) मा. अपर आयुक्त पुणे विभाग पुणे यांचे न्यायालयात दाखल केलेले अपिल क्र. आरटीएस/अ/पुणे/४४८/२०१८

८) मा. मंत्री (महसुल) यांचे न्यायालयात क्रमांक आरटीएस३४१९/९०५८/प्र.क्र.१३/ज-५ दि.२५/०२/२०१९ रोजी पारीत केलेला आदेश

९) मा.महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यालयाकडील **पत्र क्र. बीएचए/मौ. केसनंद/ग.नं.१२७०/१८-१९ दिनांक-०४/०४/२०१९** रोजीचे पत्र.

---

**जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा तिचा धारणाधिकार अकृषिक आकारणी आणि ती वरील भार याबाबत पत्र**

**(महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२क)**

**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे**
(महसूल शाखा)
क्र.PRH/PMRDA/NA/SR/३२/२०१९
पुणे, दिनांक. ५ /०४/२०१९

प्रति,

महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
सयाजीराव गायकवाड, उद्योग भवन औंध पुणे-०७

**विषय:-जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी आणि ती वरील भार याबाबत पत्र**
मौजे केसनंद ता.हवेली जि. पुणे येथील जमीन ग.नं. ९० पै. मधील १,३३,५००.०० चौ.मी. क्षेत्रास **निवासी**

**संदर्भ**:-१) आपले कार्यालयाकडील क्र. **पत्र क्र. बीएचए/मौ. केसनंद/ ग.नं.९०पै./ प्र.क्र.१२७०/१८-१९/५८१ दिनांक-२८/०२/२०१९** रोजीचे पत्र.
२) आपले कार्यालयाकडील क्र. **पत्र क्र. बीएचए/मौ. केसनंद/ ग.नं.९०पै./ प्र.क्र.१२७०/१८-१९/५८१ दिनांक-०४/०४/२०१९** रोजीचे पत्र.

महोदय,

विषयांकीत पत्रान्वये, मौजे केसनंद ता.हवेली जि. पुणे येथील जमीन ग.नं. ९० पै. मधील १,३३,५००.०० चौ.मी. क्षेत्रास **निवासी** प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १८ नुसार रेखांकन/बांधकाम परवानगी मिळणेबाबत **दिनांक. १५/११/२०१८ व दि.२८/०२/२०१९** रोजी **अर्जदार राधास्वामी**

**सत्संग ब्यास, विशाल छुगेरा प्रॉपर्टीज इंडीया प्रा.लि., श्री. विशाल अशोक छुगेरा रा. केसनंद ता.हवेली जि.पुणे** यांनी आपले कार्यालयाकडे व या कार्यालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे.



२. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एनएए-२०१७/प्र. क्र.११५/टी-१ दिनांक- १९/०८/२०१७ मधील तरतूदींनुसार आपण आपले कडील **पत्र क्र. बीएचए/मौ. केसनंद/ग.नं.९०पै./प्र.क्र.१२७०/१८-१९/५८१ दिनांक-२८/०२/२०१९** अन्वये सदर जमिनीच्या संदर्भातील भोगवटा/धारणाधिकार/अधिभार/अकृषिक आकारणी व इतर शासकीय देणी या मुद्दयांची माहिती मिळणेकामी प्रस्तुतचा प्रस्ताव व त्यालगतची कागदपत्रे या कार्यालयाकडे सादर केलेली आहेत. तदनंतर पुनर्श्च दि.०४/०४/२०१९ रोजी पत्र देऊन १,३३,५००.०० चौ.मी क्षेत्राबाबतच वस्तुनिष्ट माहीती देणेबाबत कळविलेले आहे.

३. त्यानुसार महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एनएए-२०१७/प्र. क्र.११५/टी-१ दिनांक- १९/०८/२०१७ मधील तरतूदींनुसार शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. (I) (२) (i) मधील (अ) ते (इ) मध्ये नमुद मुद्यांचे अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

४. **मौजे केसनंद तालुका हवेली, जिल्हा पुणे** येथील खालील वर्णनाची जमीन जमिनमालक यांचे हक्कनोंदणीस दाखल आहे.

| अक्र | गावाचे नाव | तालुका | सर्व्हे/गट/सिटी सर्व्हे नं. |
|---|---|---|---|
| १ | केसनंद | हवेली | ग.नं. ९० पै. |
| **अक्र** | **जमिन मालकाचे नाव** | **सर्व्हे नं./ गट नं. / सिटी सर्व्हे नं.** | **प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी)** |
| १ | राधास्वामी सत्संग ब्यास पुणे सेंटर तर्फे सेक्रेटरी एस.एन गलानी | ९० पै. | १,३३,५००.०० |
| | **एकूण क्षेत्र :-** | | १,३३,५००.०० |
| **वापरात बदलाचे प्रयोजन :-** | | **प्रयोजन-** | **निवासी** |

**५. मा. मंत्री (महसुल) यांचे न्यायालयात क्रमांक आरटीएस३४१९/९०५८/प्र.क्र.१३/ज-५ दि.२५/०२/२०१९ रोजी आदेश पारीत केलेला असुन सदरच्या मिळकतीवर नजराणा आकारणेची आवश्यकता नाही. तसेच सदर मिळकत ही देवस्थान इनाम नसलेने अकृषिक वापरासाठी विनिश्चीत प्रमाणपत्र दयावे असे आदेशित केलेले आहे.**

**६.** या कार्यालयातील उपलब्ध ॲलिनेशन रजिस्टर मधील नोंदी पहाता तसेच सदर जमीन देवस्थान इनाम नसलेबाबत मा. मंत्री महसुल यांनी दि.२५/०२/२०१९ रोजी आदेश पारीत केलेले आहेत.

**७.** विषयांकीत जमिनीचे अधिकार अभिलेखाच्या **इतर हक्कामध्ये अर्जदार यांचे नावे विविध विकास कार्यकारी सोसायटीचा बोजा नसलेबाबत नाहरकतपत्र सादर केलेले आहे.**

**८.** सन १९५० पासूनचे ७/१२ उतारे व त्यावरील फेरफार नोंद यावरुन सदरची जमिन खाजगी/ राखीव वनसंवर्गात मोडत नाही.

**९.** प्रकरणी या कार्यालयाकडील पत्र क्र.PMRDA/NA/SR/३२/२०१९, दिनांक.०२/०४/२०१९ अन्वये खालीलप्रमाणे अकृषिक सारा, रूपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा करणेबाबत अर्जदार यांना कळविणेत आलेले होते.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | बिगरशेती आकारणी क्षेत्र (१,३५,०००.०० चौ.मी.) | -- |
| २ | बिनशेती आकारणीचा दर (प्रति चौ.मी. ) | ०.१० |
| ३ | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी | **१३५००.००** |
| ४ | रुपांतरीत कराची आकारणी | **६७५००.००** |
| ५ | जिल्हा परिषद कर | **९४५००.००** |

housiey.com

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | ग्रामपंचायत कर | १३५००.०० | |
| ७ | वतन संवर्गातील जमिन असल्यास ५० टक्के नजराना रक्कम | ०.०० | 3 |
| ८ | वसूल करावयाची एकूण रक्कम रुपये | १,८९,०००.०० | |

त्यानुसार वरीलप्रमाणे नमुद अकृषिक सारा, रूपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा केलेबाबत अर्जदार यांनी चलन क्र. GRN MH०००००८२६४९२०१९२०M दिनांक. ०२/०४/२०१९ या कार्यालयास सादर केले आहे.

११. नागरी कमाल जमिन धारणा कायद्यांतर्गत असलेल्या केसेस (यु.एल.सी.), कुलमुख्त्यारपत्र, वनजमीन, मोजणी नकाशा, जागा पाहणी, विद्युतवाहीनी, भुसंपादन, पर्यावरण विभाग ना-हरकत (Environment Clearance), एअर फोर्स, रेडझोन परिक्षेत्र (वर्क्स ऑफ डिफेन्स अॅक्ट) उदा.देहु अॅम्युनेशन डेपो, दिघी मॅगेझिन, उच्च ऊर्जा पदार्थ अनुसंधान प्रयोगशाळा (HEMRL), INS शिवाजी, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA), पर्यावरण संवेदनशिल असलेली गांवे (ESA) इ. तांत्रिक बाबींची खात्री नियोजन प्राधिकारी म्हणुन **महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर विकास क्षेत्र प्राधिकरण, पुणे** यांनी त्यांचे स्तरावर करूनच रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी देणे अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे विषयांकीत जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, ती वरील अधिभार रूपांतरण कर, अकृषिक आकारणी तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी याबाबतची वस्तुनिष्ठ माहिती सादर करण्यात येत आहे. तरी विषयांकीत जमिनीवरील रेखांकन/बांधकाम आराखडयांना उपरोक्त नमुद बाबींच्या पडताळणी अंती मंजूरी देण्याबाबत शासन परिपत्रक दि.१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (ii) मध्ये नमुद केलेप्रमाणे आपले स्तरावर विहित मुदतीत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**मा. जिल्हाधिकारी सो**
**यांचे मान्यतेने**

(विवेक जाधव)
**तहसिलदार महसुल**
**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे**

**प्रत:- अर्जदार राधास्वामी सत्संग ब्यास, विशाल छुगेरा प्रॉपर्टीज इंडीया प्रा.लि., श्री. विशाल अशोक छुगेरा रा. केसनंद ता.हवेली जि.पुणे**

शासन परिपत्रक दिनांक-१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे पुणे महानगर विकास क्षेत्र प्राधिकरण यांनी त्यांचे स्तरावर रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी दिलेनंतर **रेखांकन/बांधकाम परवानगीची साक्षांकीत प्रत या कार्यालयाकडे सादर करावी.** जेणेकरून प्रस्तुत जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ मध्ये जमिन अकृषिक झाल्याची नोंद घेणेकामी पुढील आवश्यक ती कार्यवाही करता येईल.

(विवेक जाधव)
**तहसिलदार महसुल**
**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे**